# अमरावती शहर  दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक  २२/०७/२०२४

## बेकायदेशिर  जमाव   :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजापेठ अप क्र ४३६/२०२४ कलम ३३३, १८९(२) १९१(२), १९०, ३२४(२), १२५ भां न्या सं सहकलम १३५ मपोका | जेवड नगर अमरावती | घ.ता. वेळ -दि १९/०७/२४ चे ०१.४० वा . ते ०२-०० वा. दरम्यान<br><br>दाखल ता वेळ -दि २१/०७/२४ चे १६-१२ वा | एक महिला | १)जय कडु, २)पियुष बुंदिले, ३)देवा मडावी, ४)सोनु सामरेव अधिक चार अनोळखी इसम | हकीगत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी हे पती व मुलासह घरी झोपले असता नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील आरोपीतांनी फिर्यादीचे घराच्या कम्पाऊन्ड मध्ये बेकायदेशीर प्रवेश करून मुख्य दाराला लाथा मारून मोठमोठ्याने ओरडुन शिवीगाळ करून दरवाजा उघडण्याचा प्रयत्न केला.फिर्यादीने घराच्या खिडकीतुन बघीतले परंतु दरवाजा उघडला नाही.नमुद आरोपीतांनी खिडकीवर दगडफेक केली.घरासमोर असलेले सिसीटिव्ही कॅमेरावर गोटमार केली व घरासमोरील पाण्याचा नळ सुध्दा तोडुन नुकसान केले.तसेच मारण्याची धमकी दिली.ते सर्व इसम तेथुन निघुन गेले.फिर्यादीने त्यांची आत्या हिला फोनकरून  पोलीसांचा नंबर मागीतला असता फि.च्या आत्याने सुध्दा सांगीतले की, काही इसम गाडीवर आले व घरावर गोटमार करून शिवीगाळ केली व मारण्याच्या धमक्या दिल्या. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. फ्रेजरपुरा ६४०/२०२४ कलम ११८(१), ३५२ बी. एन. एस. २०२३ | यशोदा नगर नं. २, गोगटे किराणा गल्ली, अमरावती. | घ. ता. वेळ - दि. २१.०७.२०२४ चे चे १५.३० वा. दरम्यान. दाखल ता वेळ - दि. २१.०७.२०२४ चे १९.५१ वा. | गजानन राम भारती ,वय ३० वर्ष, धंदा मजुरी, रा. यशोदा नगर नं. २, गोगटे किराणा गल्ली, अमरावती. | जिवा गुडधे, वय १८ वर्ष, रा. यशोदा नगर नं. १, व-हाड संस्थेच्या गल्लीत, अमरावती. | हकिकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी व आरोपी हे एकाच मोहल्यातील राहणारे असुनत्यांचा चार महिण्याआधि गमंतीजमतील वाद झाला होता. नमुद घटना ता वेळी व ठिकाणी जुन्या वादाच्या कारणावरुन फिर्यादी हे कांबळे गल्ली गुणवंत महाराज यांचा महाप्रसाद घेण्याकरीता जात असतांना आरोपी शिवीगाळ करु लागला असता फिर्यादी त्याला समजावित असतांना त्यांने त्याच्या जवळील चाकुने फि. चे डाव्या हातावर मारुन जखमी केले. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट व मेडीकल सर्टीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

जबरीचोरीः-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | गाडगे नगर अमरावती अपक्. ६२६/२४ कलम- ३०९(४) बीएन एस | दतविहार कॉलनी अमरावती | दि.२१/७/२० २४ चे १८.००ते १८.३० वा<br><br>दि.२१/७/२० २४ चे २१.५४ वा | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, नमुद घतावेळी व ठिकानी यातील फिर्यादी ही मैत्री सोबत नमुद ठिकानाहुन जात असताना एक अज्ञात इसम मागुन पायदळ आला व फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याची ७ग्रँम मंगळसुत्र कि.अं.२७१०२/-रु त्याच्या हाताने ओढुन हिसकावुन पळुन गेला व नँशल हायवे च्या रोड कडे १ इसम मोटार सायकल घेवुन उभा होता त्याच्या गाडीवर बसुन दोन्ही अज्ञात इसम पळुन गेले.अशा फिर्यादी च्या जबानी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## वाहणचोरी:-

| अ. क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो स्टे सिटी कोतवाली अम शहर अप क्र २८५/२०२४ कलम ३०३(१), ३०३(२) BNS | रसवंतीच्या बाजुला बस स्टॉप अमरावती | गुन्हा घ ता वेळ - दि २१/०७/२०२४ चे १६.३० वा दरम्यान<br>दा ता वेळ - दि २१/०७/२०२४ चे २२.२२ वा | माणिक रामदास मुंदावणे वय ५७ वर्ष व्यवसाय शेती रा शेवती जहागीर ता जि अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ ता वेळ व ठिकाणी यातील फिर्यादी हे त्याचे बहिणीला आर्वी बसमध्ये बसवुन देणे करीता अमरावती बस स्टॉप येथे आले असता त्यंनी त्यांची स्वताची मोटार सायकल हरो होन्डा कंपनीची स्प्लेंन्डर प्लस गाडी क्र MH२७AL६२२९ लाल पटटे असलेली जिचा इंजिन नंबर - HA१०EFAHH७३००६, चेचिस नंबर - MBLHA१०EYAHH२४०५० किंमत अंदाजे २०,०००/- रु ही नमुद घटनास्थळी उभी केली व बहीणीला आर्वी बस मध्ये बसवुन देणे करीता बस स्टॉप मध्ये गेले असता बहीणीला बस मध्ये बसवुन परत गाडी ठेवलेल्या ठिकाणी आले असता त्यांना त्यांची नमुद गाडी हि दिसुन आली नाही फिर्यादीनी आजुआजुला शोध घेतला असता मिळुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात इसमाने चोरुन नेली आहे. अशा फिर्यादीचे जबानी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशाने सदर गुन्हा दाखल |

अपघात :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटाा स्थळ | गु.घटाा ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो ाांव पत्ता | आरोपीचे ााव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजापेठ अप क्र ४३७/२०२४ कलम २८१, १२५(अ) भां न्या सं सहकलम १३४/१७७ मोवाका | महेंद्र लॉन जवळ सातुर्णा अमरावती | घ.ता. वेळ - दि २१/०७/२४ चे १०.१५ वा. दरम्यान<br><br>दाखल ता वेऴ -दि २१/०७/२४ चे २०.४८ वा | एक महिला | शिवशाही एस.टी. बस क्र. १७७८ चा चालक | हकीगत अशा प्रकारे आहे की, नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी यांची लहान मुलगी वय १६ वर्ष हि ट्युशन करून घरी येत असतांना महेंद्र लॉन सातुर्णा जवळ अपघात झाल्याची माहिती मिळाल्याने फिर्यादीने घटनास्थळी जावुन पाहिले असता त्यांची मुलगी हि गंभीर जखमी झाल्याने तिला रिम्स हस्पीटल येथे भर्ती केले. तसेच जमलेल्या लोकांना विचारपुस केली असता त्यांना माहित पडले की,शिवशाही एस.टी. बस क्र. १७७८चा चालकाने त्याची बस लापरवाहिने चालवुन फिर्यादीच्या मुलीच्या सायकलला बस ओवर टेक करत असतांना ठोस लागल्याने अपघात झाला व एस .टी. चालक न थांबता निघुन गेला. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल |

## अकस्मात मृत्यु -

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | घटना ता वेळ<br><br>दाखल ता वेळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | फ्रेजरपुरा मर्ग क्र. ५५/२०२४ क. १९४ BNS २०२३ | मध्यवर्ती कारागृह अमरावती | घटना ता वेळ - दि. १६/०७/२०२४ चे २३/०० वा. दरम्याण<br><br>दाखल ता वेळ - दि. २१/०७/२०२४ चे १४/११ | न्यायाधीन मार्गस्थ कैदी नामे भगवान नथ्थुजी श्रीरामे वय ५५ वर्ष रा. मु. पो. तिवसाळा पो स्टे पांढुर्णा खुर्दी ता. घाटंजी जि. य़वतमाळ | दिपक रमेशराव टोणपे वय ४५ वर्ष मध्यवर्ती करागृह अमरावती मतर्फे मसपोउपनि. अनुसया पचारे ब. न. १०८७ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर | ऑनींमीया आजारा उपचारा दरम्याण मृत्यु | हकीकत अश्या प्रकारे आहे की आज रोजी आम्ही मसपोउपनि.अनुसया पचारे ब. न. १०८७ पो स्टे फ्रेजरपुरा अमरावती शहर आमची पोस्टे ला स्टे डा अंमलदार ड्युटी सुरु असतांना पो स्टेचे बारनीशी मपोहेकाँ. पौर्णीमा यांनी पो स्टे अजनी नागपुर शहर येथील मर्ग क्र. ००/२०२४ क. १९४ भा.न्याय संहीता ची मर्ग डायरी आणुन दाखल केली यातील नमुद न्यायाधीन मर्गस्थ कैदी अप. न. ५९/१९९९ एस.टी. क्र. ७६/१९१९ क. ३०२ भादवि. मधील अतिरीक्त सत्र न्यायालय पुसद जि. यवतमाळ यास कलम ३०२ भादवि. अंतर्गत जन्मठेपेची शिक्षा सुनावली असुन सदर शिक्षा बंदी अमरावती मध्यवर्ती कारागृह ये्थे शिक्षा भोगत होता शिक्षा बंदी हा ऑनीमीया आजाराने त्रस्त होता.त्याला श्वास घेण्यास त्रास होत होता. करीता त्यास अमरावती कारागृह येथील मा. वैधकीय अधिकारी श्री राजणकर यांच्या सल्याने स्पेशालीटी हाँस्पीटल अमरावती येथे पाठविले होते. त्यास आय सी आय मध्ये आंतर रुग्ण म्हमुन दाखल करुन घेतले. तेथे बंद्यावर वैधकीय उपचार सुरु होते.दि. १८/०३/२०२४ रोजी बंद्याची अचानक प्रकृती जास्त खराब झाली अशल्याने अमरावती कारागृहाचे महेन्द्र शहाणे, सचिन वाघाळे,यांच्या हस्ते उपचारा कामी शासकीय महाविद्यालय नागपुर येथे उपचाराकरीता पाठविण्यात आले.सदर शिक्षा बंदीवर उपचार सुरु असतांना दि. १६/०७/२०२४ रोजी रात्री ०१/०० वा. सुमारास तीकीट क्र. ३७७५०९७१ एम एल सी. न. २००९२ वर दि. १६/०७/२०२४ चे २३/२८ वा. दरम्याण डाँ डी बी राउत यांनी सदर न्यायाधीश मार्गस्थ कैदी नामे भगवान नथ्थुजी श्रीरामे वय ५५ वर्ष रा. मु. पो. तिवसा पो स्टे पांढुर्णा खुर्दी ता. घाटंजी जि. य़वतमाळ यास मृत घोषीत केले. करीता सदरचा मर्ग दाखल करण्यात आला |
| ३ | राजापेठ मर्ग क्र. | घटनास्थल - मृतक यांचे | घ.ता.वेळ - दि. | राम विनायकराव | राजेंद्र विनायकराव | राहत्या घरात | थोडक्यात हकीत अशाप्रकारे आहेकी, यातील फिर्यादीचा मृतक हा लहान भाऊ असुन तो प्लबींगचे काम करत होता. व एकाच घरात पहिल्या माळ्यावर राहत होता.त्याची पत्नी सुध्दा |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ६०/२०२४ कलम १९४ BNSS | राहते घर छांगानी नगर राम मंदिर जवळ अमरावती | २१/०७/२०२४ चे १४-०० वा.<br><br>दा.ता.वेळ - दि. २१/०७/२०२४ चे १८-१० वा. | खानझोड वय ३५वर्ष रा. छांगानी नगर राम मंदिर जवळ अमरावती | खानझोड वय ४३ वर्ष रा. छांगानी नगर राम मंदिर जवळ अमरावती | गळफास घेवुन | कारखान्यात टेलरींगचे काम करण्यास जात होती. ,नमुद घ.ता.वेळीव ठिकाणी फि. चा भाऊ मृतक नामे राम विनायकराव खानझोड वय ३५वर्ष हि १०.०० वा. कामाला गेला व ०१.०० वा. जेवनाकरीता घरी आला. त्याचा मुलगा खाली खेळत होता. त्यास आज जेवनात काय बनविले तर त्याने गुलाब जामुन खाल्ले म्हणुन त्यास फि.ने आणायला वर पाठविले असता तो घाबरून खाली आला व लवकर वर चला असे म्हटले फि. ने वर जावुन पाहिले असता त्यांना त्याचा भाऊ बेडरूममध्ये पख्याला दोरी बांधन फासावर लटकलेला दिसला. त्याचा श्वाशोच्छवास सुरू आहे हे बघीतले असता तो बंद होता. फि. च्या भावाने गळफास घेवुन जिवन संपविले. कोणाही विरूध्द कुठलीही तक्रार नाही व कोणावरही संशय नाही. अशा फि. च्या जबानी रिपोर्ट वरून सदरचा मर्ग दाखल . |